# जन धन
# शिक्षा - I




लेसन्स
रीसोर्स्ड
आयडिया

प्रधानमंत्री जन-धन योजना
मेरा खाता भाग्य विधाता

# बचत का आवश्यक आहे?



सध्या न परवडणाऱ्या वस्तू पैसे साठवून व वाढवून घेता येण्याकरता



आजारपण, आपत्ती, अपघात, मृत्यू अशा अचानक उद्‌भवणाऱ्या अडचणींच्यावेळी खर्च भागविण्यासाठी



घर खरेदी, उच्च शिक्षण अशा मोठ्या खर्चिक बाबींची तरतूद करण्यासाठी



ज्या वेळी आपण कमाई करू शकत नाही अशा वृद्धापकाळातील खर्चासाठी

# बचत बँकेत का करावी?



**सुरक्षितता**

घरातील कपाटात, पेटीत, चटईखाली किंवा अगदी पाकीटात ठेवलेले पैसे केव्हाही चोरीला जाऊ शकतात, किंवा ते नाहीसे होऊ शकतात. पूर, आग, अशा आपत्तीच्या वेळी या पैशांचे नुकसान होऊ शकते त्याऐवजी बँकेत पैसे ठेवणे सर्वदृष्टीने सुरक्षित असते.



**पैशाची वृद्धी**

बँकेतील खात्यावर ठेवलेल्या पैशावर आपल्याला व्याज मिळू शकते. त्यामुळे आपल्या पैशाची वाढ होऊ शकते. घरात ठेवलेला पैसा वाढत नाही.



**कर्ज**

आपण बचत केलेल्या पैशावर, मुदत ठेवींवर, पुनरावृत्ती ठेवींवर आपल्याला कर्ज मिळू शकते. त्यामुळे घर खरेदी, शिक्षण अशा खर्चासाठी पैसा उभारता येतो.

# आपल्या ग्राहकाची ओळख (के.वाय.सी.)

1

- बँकेत खाते उघडतेवेळी ग्राहकाची ओळख पटवण्यासाठी आणि त्याच्या राहत्या घराचा पत्ता नोंदविण्यासाठी माहिती जमा करण्याची प्रक्रिया म्हणजे केवायसी

2

- “के.वाय.सी.”साठी अधिकृतपणे ग्राह्य धरण्यात येणारी कागदपत्रे : अ) पासपोर्ट ब) वाहन परवाना क) मतदार ओळखपत्र ड) पॅन कार्ड इ) आधार कार्ड फ) “मनरेगा” कार्ड

3

- या कागदपत्रांवर राहण्याचा पत्ता दिलेला असेल तर ती कागदपत्रे पत्त्याला पुरावा म्हणून ग्राह्य धरली जातील




पासपोर्ट




मनरेगा




वाहन परवाना



छायाचित्र




आधार कार्ड




पॅन कार्ड




मतदार ओळखपत्र

**जर अधिकृत कागदपत्रे नसतील तर -**

अलिकडच्या काळातील स्वत:चे छायाचित्र सादर करून त्यावर बँक अधिकाऱ्यासमक्ष स्वाक्षरी किंवा अंगठा करून **छोटे खाते** उघडता येते.

खातेदार सज्ञान झाल्यावर म्हणजे त्याने 18 वर्ष पूर्ण केल्यावर त्याने केवायसी साठी नव्याने कागदपत्रे सादर करावीत.

# बँकेतील खात्याचे प्रकार

## बचत खाते

- खात्यावर सुलभपणे पैसे भरणे किंवा काढण्याची सोय
- या खात्यावर ग्राहकाला पासबुक, चेक बुक, एटीएम कम डेबिट कार्ड मिळते
- ठेवीवर व्याज मिळते

## करंट अकौंट (चालू खाते)

- संस्था किंवा कंपनीच्या नावाने हे खाते उघडता येते
- यातील व्यवहारावर कोणतीही मर्यादा नाही
- या खात्यातील ठेवीवर व्याज मिळत नाही

## आवर्ती ठेव खाते

- आवर्ती निर्धारित रक्कम निश्चित काळासाठी ठेवी स्वरूपात ठेवली जाते
- या खात्यावर बचत खात्यापेक्षा अधिक व्याज मिळते
- ठेवीची मुदत संपल्यावर किंवा त्या आधी सुद्धा ठेवलेले पैसे काढता येतात

## मुदत ठेव

- यात 7 दिवस ते 10 वर्ष या अवधीसाठी पैशाची ठेव ठेवता येते
- मुदत ठेवीवर अधिक व्याज मिळते
- दरमहा किंवा दर तीन महिन्यांनी व्याजाची रक्कम काढता येते

## छोटे खाते

केवायसीसाठीची अधिकृत कागदपत्रे नसणाऱ्या व्यक्तीला स्वत:चे छायाचित्र सादर करून त्यावर बँक अधिकाऱ्यासमक्ष स्वाक्षरी अथवा अंगठा करून खाते उघडता येते. हे खाते 12 महिने मुदती पर्यंतच चालू शकते. त्यातील ठेवीची रक्कम 50 हजार रुपयांपेक्षा अधिक असता कामा नये.

## बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट अकाऊंट

या खात्यावर किमान शिल्लक रक्कम ठेवण्याची अट नाही. या खात्यावर डेबिट कार्ड मिळते. 10 वर्ष वयावरील कोणत्याही व्यक्तीला “बीएसबीडी” खाते उघडता येते.

# सेवा

## देयके (रिमीटन्स)

- बँकेमार्फत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किंवा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे पैसा सुलभ व जलद तसेच सुरक्षितपणे हस्तांतरीत करता येते.
- बँकेच्या कोणत्याही शाखांमध्ये, बँक मित्र, मायक्रो एटीएम, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एनईएफटी, आरटीजीएस मार्फतही हे व्यवहार करता येतात

## मोबाईल बँकींग

- निधी हस्तांतरण एनईएफटी /आरटीजीएस, आयएमपीएस आणि बिलांची पेमेंट्स

## एटीएम कार्ड

- पैसे काढण्यासाठी सर्व एटीएम केंद्रांवर चालते व पीओएस मशीनद्वारे "कॅशलेस" खरेदी करता येते.
- एटीएम मशीन किंवा पीओएस मशीन व्यवहारासाठी पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर (पिन) वापरला जातो
- पिन नंबर ठराविक अवधीनंतर बदलता येतो. हा नंबर अन्य कोणास कळू देऊ नये
- निरक्षर व्यक्तीलाही एटीएम कार्ड जारी केले जाते
- रूपे डेबिट कार्ड हे नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया तर्फे जारी करण्यात येणारे देशांतर्गत वापरासाठीचे स्वदेशी कार्ड आहे. त्यात एक लाख रूपयाच्या विम्याचा अंतर्भाव असतो

## इंटरनेट बँकींग

- इंटरनेट बँकींगही इलेक्ट्रॉनिक् पेमेंट सिस्टिम आहे
- याद्वारे निधी हस्तांतरण, बिलांचे पेमेंट, खात्याच्या व्यवहारांचा तपशील जाणून घेणे, तिकीट बुकिंग, ऑनलाईन शॉपिंग असे व्यवहार करता येतात.

## कर्ज

- घर खरेदी, कार खरेदी, गृहपयोगी वस्तू, शिक्षण इत्यादींसाठी बँकेकडून कर्ज मिळू शकते
- शेती, व्यापार, उद्योग, सेवा क्षेत्र अशा व्यवसायासाठीही बँकेकडून कर्ज दिले जाते
- जुगार वगैरे सारख्या बेकायदेशीर व्यवहारासाठी बँकेकडून कर्ज दिले जात नाही
- खासगी सावकारांपेक्षा बँकांच्या कर्जावरील व्याजदर खूप कमी असतो

## ओव्हरड्राफ्ट

मंजूर मर्यादेनुसार खात्यातून जादा पैसे काढता येतात

## निवृत्तीवेतन

अटल पेन्शन योजने अंतर्गत 16 हजार रुपये ते 5 हजार रुपये निवृत्तीवेतन मिळू शकते. त्यासाठी खाते सुरू करण्याची वयोमर्यादा 18 ते 40 वर्ष

# सामाजिक सुरक्षा योजना

## प्रधानमंत्री जन-धन योजना

- मा. पंतप्रधानांच्या हस्ते 28 ऑगस्ट 2014 रोजी या योजनेचे उद्घाटन झाले.
- ग्रामिण तसेच शहरी भागातील कुटुंबांवर लक्ष केंद्रीत करून ही योजना सुरू करण्यात आली आहे.
- या योजनेअंतर्गत 10 वर्ष व यावरील अज्ञान व्यक्तीसही बँकेत बचत खाते उघडता येते.
- खातेधारकाला 1 लाख रुपयांच्या अपघात विमा सुरक्षेची तरतूद असलेले रूपे डेबिट कार्ड जारी केले जाते. हे कार्ड मोफत आहे.
- अपघात विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी 45 दिवसातून किमान एकदा रूपे डेबिट कार्डाचा वापर करणे आवश्यक आहे
- सहा महिने खात्याचे सुरळीत परिचालन केल्यानंतर खाते धारकाला पाच हजार रुपयांची ओव्हरड्राफ्टची सवलत मिळू शकते

## प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना

- "पीएमएसबीवाय" ही दोन लाख रुपयाची अपघात विमा संरक्षण देणारी योजना आहे. अपघात जखमी झाल्यास अथवा मृत्यू आल्यासही मदत मिळते.
- वार्षिक 12 रुपये हफ्ता भरून 18 ते 70 वयो गटातील सर्व बचत खातेधारकांना ही योजना लागू आहे. या योजनेच्या सदस्यत्वाचे दरवर्षी नुतनीकरण करावे लागते.

## प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना

- पीएमजेजेबीवाय ही कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास 2 लाख रुपयांचा आर्युर्विमा देणारी विमा योजना आहे.
- बँकांच्या सर्व शाखा / बँक मित्रांकडे उपलब्ध.
- 18 ते 50 वर्ष वयोगटातीदल सर्व बँक बचत खातेधारक या योजनेसाठी पात्र
- या योजनेसाठी वार्षिक 330/- रुपयांचा प्रिमियम हप्ता (अधिक सेवा कर) दरवर्षी खातेधारकाने या योजनेच्या सदस्यत्वाचे नूतनीकरण करणे गरजेचे आहे.

# प्रधान मंत्री मुद्रा योजना (पीएमएमवाय)

- **माननीय पंतप्रधानांनी 08.04.2015 रोजी प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा प्रारंभ केला. ही योजना "सिडबी" म्हणजेच स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँकेची उपकंपनी आहे.**
- नॉन-कॉर्पोरेट अशा छोट्या व्यावसायिकांना वित्तीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे.
- छोटे उत्पादन करणारे उद्योग, दुकाने, फळ/भाजी विक्रेते, ट्रक आणि टॅक्सी व्यवयाय करणारे, अन्न सेवा देणारी केंद्रे, दुरूस्ती करून देणारी दुकाने, लघु उद्योग, घरगुती अन्न प्रक्रिया, फेरीवाले आणि अन्य असंख्य छोट्या व्यावसायिकांना प्रोत्साहन देणे, त्यांना बँकेमार्फत वित्तीय कर्ज मिळवून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

## मुद्रा धोरण

गरीबांच्या सर्वसमावेशक सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी जागतिक पातळीवरील पद्धती आणि दर्जानुसार एकात्मिक वित्तीय आणि साहाय्यभूत सेवा पुरवठादार होणे.

## मुद्रा मोहीम

आर्थिक आणि वित्तीय सुरक्षेचे ध्येय साकारण्यासाठी आमच्या भागीदार संस्थांच्या मदतीने सर्वसमावेशक, शाश्वत आणि मूल्याधारित उद्योजकीय संस्कृतीची स्थापना करणे.

## मुद्रा ध्येय

भागीदार संस्थांना प्रेरित करून व पाठींबा देऊन लघुउद्योग क्षेत्राला वाढीसाठी पूरक आर्थिक वातावरण निर्मिती करून विकास साध्य करण्याचा आमचा मूलभूत उद्देश आहे.

**प्रश्न : आपणास माहित आहे का, की तांत्रिक पदवीधर सुद्धा मुद्रा योजने अंतर्गत कर्ज घेऊ शकतात?**
उत्तर : व्यवसाय आणि प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी या वर आधारीत आपण नियमानुसार "मुद्रा" साठी नेमलेल्या मध्यस्थांमार्फत कर्ज पुरवठ्याचा लाभ घेऊ शकता.

# कर्जाची वर्गवारी

| शिशू | किशोर | तरूण |
|---|---|---|
| 50,000/- रुपयांपर्यंत | 50,000 हजार ते 5 लाख रुपयापर्यंत | 5 लाख ते 10 लाख रुपयापर्यंत |

जामीनदाराची गरज नाही

शिशु कर्जासाठी प्रोसेसिंग फी अथवा मार्जिन मनीची गरज नाही







रु. 10 लाखापेक्षा कमी गुंतवणुकीची गरज असलेले निर्मिती, प्रक्रिया किंवा सेवा क्षेत्रातील उद्योग (बिगरकृषी क्षेत्र) सुरू करून उत्पन्न मिळवू इच्छिणारे कोणतेही भारतीय नागरीक.

'रूपे' डेबिट कार्डच्या स्वरूपात 'मुद्रा' कार्ड संबंधिताला दिले जाईल. त्याद्वारे एटीएम मशीन, बँक मित्र अथवा पीओएसच्या माध्यमातून 'ओव्हरड्राफ्ट'च्या स्वरूपात खेळते भांडवल पुरवले जाईल.

# प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत कर्ज कसे मिळवावे?



कर्जदार

व्यवसायाची योग्य निवड

कर्जाचा अर्ज




सार्वजनिक/खासगी क्षेत्रातील व्यापारी बँक, पीआरबी किंवा सहकारी बँक



कर्ज अर्जावर योग्य प्रक्रिया



कर्जासाठीच्या कागदपत्रांची अंमलबजावणी

मंजुरी/कर्जाचे वितरण

अधिक तपशीलासाठी जवळच्या कोणत्याही बँक शाखेला भेट द्या किंवा www.mudra.org.in वर लॉग ऑन करा.